International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# चोल साम्राज्यातील उत्तरमेरूर येथील आदर्श लोकशाही निवडणूक पद्धती व ग्राम प्रशासन

**प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा**

*विभाग प्रमुख, प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती (A. I. H. & C.) व सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त)*

***Corresponding Author –* प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा**

**DOI - 10.5281/zenodo.18709734**

**गोषवारा:**

*चोल साम्राज्यात कांचीपुरम येथील उत्तरमेरूर गावात वैकुंठ पेरूमल मंदिराच्या भिंतीवर दोन शिलालेख आहेत. त्यावर त्या उत्तरमेरूर गावाचे ग्राम प्रशासन व लोकशाही निवडणूक पद्धतीचे उल्लेख आहेत. ब्रह्मदेय सभा नावाने चोल राजांकडून दान दिलेल्या गावात स्थानिक स्वशासन सभा आणि वारियम द्वारे चालणारी स्वायत्त संस्था होती. या गावात ३० वार्ड होते. प्रत्येक वार्डातून एक प्रतिनिधी यादृच्छिक पद्धतीने म्हणजेच पारदर्शक पद्धतीने निवडून दिले जात असे. प्रतिनिधी निवडताना उमेदवाराचे काही निकष ठरविले आहेत. त्या निकषात उमेदवार पात्र असेल तरच निवडणूक लढवू शकतो. निवडून आल्यानंतर सदर प्रतिनिधीला विना मानधन वर्षभर विविध समितीवर काम करावे लागत असत. जर कोणी भ्रष्टाचार किंवा अयोग्य काम करत असेल तर त्यास गाढवावरून मिरवणूक काढणे ही अंतिम शिक्षा होती. अतिशय कठोरपणे आदर्शवादी असे लोकशाही निवडणूक पद्धतीने उत्तरमेरूर गावात स्थानिक स्वशासन चालत होते.*

***सूचनक शब्द (की वर्ड) : निवडणूक, उमेदवार निकष, चिठ्ठी पद्धत, ब्रह्मदेय सभा, मंदिर, कुडवोलै, वारीयम***

## प्रस्तावना:

प्राचीन काळापासून दक्षिण भारतात चेर, पल्लव, पांड्य आणि चोल शासकांनी आपले साम्राज्य प्रस्थापित केले होते. या शासकांनी राज्य करत असताना त्यांच्या त्यांच्या राज्यात तसेच जवळपास प्रत्येक राज्यकर्ता शैव, वैष्णव व शाक्त पंथीयांचे मंदिर बांधले आहेत. तसेच इतर धर्मीय सहिष्णू धोरण राबवत जैन व बौध्द धर्मांना आवश्यक त्या ठिकाणी ग्रामदान देऊन जैन व बौद्ध धर्माचे संरक्षण केले आहे. एकट्या तामिळनाडू राज्यात जवळपास ७९००० विविध मंदिरे आहेत. उत्तरमेरूर येथील हे मंदिर मूळचे पल्लव राजा नंदिवर्मन द्वितीय (इ.स. ७३०–७९५) यांनी बांधले होते, नंतर चोलांनी त्यात भर घातली. गावाला उत्तरमेरूर चतुर्वेदीमंगलम असे नाव होते, कारण ते १२०० वैष्णव ब्राह्मणांना दान दिलेले ब्रह्मदेय गाव होते.

चोल शासकांनी तीन प्रकारचे ग्राम दान म्हणून दिले होते. त्यापैकी 'ब्रह्मदेय' ही एक प्रकारची ग्राम दान दिलेले जमीन प्रकार होती. या ब्रह्मदेय ग्राम दानामध्ये ब्राह्मणांना करमुक्त जमिनी दान दिल्या जात, ज्यांना 'ब्रह्मदेय' असे म्हणत. ही गावे विद्वान ब्राह्मणांसाठी स्थापन केली गेली, जिथे शास्त्रांचे शिक्षण, धार्मिक कार्ये आणि सामाजिक व्यवस्था यांना प्राधान्य होते. सदर गावातील व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी स्थानिक प्रशासन स्थापन केली होती. सदर स्थानिक प्रशासन चालविण्यासाठी निवडणूक घेतली जात होती. सदर निवडणूक गावातील नागरिक स्वत:हून स्वत: लोकशाही पद्धतीने पारदर्शक दृष्टीने

राबविण्यात येत असत. सदर निवडणूक पद्धतीवर प्रकाश टाकणे संशोधकाचे उद्दिष्ट आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट्ये :**

१. उत्तरमेरूर या गावातील आदर्श लोकशाही निवडणूक पद्धतीवर प्रकाश टाकणे.

२. सुमारे १४०० वर्षापूर्वीचे आदर्श लोकशाही पारदर्शक पद्धतीचे विचार करणे.

३. उत्तरमेरूर गावाचे स्थानिक स्वायत्त ग्राम प्रशासन पद्धतीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधन लेखन हे राजकीय, सामाजिक व ऐतिहासिक दृष्टीने संशोधक प्रकाश टाकण्याच्या विचाराने संशोधन लेखन करत आहे. यासाठी उत्तरमेरूर या स्थानिक स्वायत्त ग्राम प्रशासनाबाबत आज अखेर ज्या विद्वान, अभ्यासक, संशोधक यांनी जे संशोधनात्मक कार्य केले आहे याचा आढावा घेऊन वस्तुस्थिती वस्तुनिष्ठ संशोधन लेखन पद्धतीचा वापर केला आहे. उत्तरमेरूर येथील दोन मूळ उपलब्ध शिलालेख यांचा प्राथमिक साधन म्हणून आणि त्यावरील तामिळनाडू शासनाने इंग्रजीत भाषांतर केलेले प्रमाणित ऐतिहासिक दस्तऐवज असे दुय्यम साधन म्हणून तसेच या विषयावरील जर्नल्स, ग्रंथ यांचा इतर प्राथमिक व दुय्यम साधनांचा अभ्यास करून संशोधन लेख पूर्ण केले आहे.

**चोल साम्राज्यातील उत्तरमेरूर येथील आदर्श लोकशाही निवडणूक पद्धती व ग्राम प्रशासन**

**उत्तरमेरूर येथील दोन शिलालेख:**

चोल साम्राज्याच्या उत्तरमेरूर येथील दोन शिलालेख हे प्राचीन भारतातील स्थानिक स्वशासन म्हणजेच लोकशाही व्यवस्था आणि प्रशासकीय व्यवस्थेचे उत्कृष्ट उदाहरण मानले जाते. यातील एक ९२० चा चोल राजा परांतकाच्या १४व्या वर्षी आणि दुसरा ९२५ चा चोल राजा परांतकाच्या १९ व्या वर्षीचे आहेत, त्यात स्थानिक स्वायत्त संस्था, विशेषतः 'सभा' ब्राह्मण गावातील सभा आणि तिच्या कार्यपद्धतीबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. शिलालेखाचे स्वरूप आणि भाषा हा शिलालेख तमिळ ग्रंथ लिपीत कोरलेला आहे. ते दोन शिलालेख मंदिराच्या सभामंडपाच्या भिंतीवर आहेत. त्यातील मजकूर ही संपूर्णपणे सभा किंवा महासभा घटनेचा, निवडणूक प्रक्रियेचा आणि प्रशासकीय नियमांचा तपशील देतो.[१]

**स्थानिक स्वशासन - सभा आणि वारियम् म्हणजेच समित्या:**

उत्तरमेरूरमधील सभा ही ब्राह्मण गावातील स्थानिक स्वायत्त संस्था होती, ज्याला 'ब्रह्मदेय सभा' असे म्हटले जाते. गावस्तरावर 'सभा' नावाची स्वायत्त संस्था कार्यरत होती, जी प्रामुख्याने ब्राह्मण जमीन मालकांची होती.

सभेद्वारे 'वारियम्' म्हणजेच समित्या स्थापन केल्या जात, ज्या गावातील प्रशासकीय कार्ये हाताळत, जसे की कर संकलन, मंदिर व्यवस्थापन, आणि सिंचन. ही सभा गावातील जमीन मालक आणि विद्वान ब्राह्मणांनी बनलेली होती.

सभेच्या कार्यासाठी विविध सहा समित्या स्थापन केले होते. समित्यांना वारीयम असे म्हणत असत.[२] ते पुढील प्रमाणे

१. उद्यान वारीयम – बागा, झाडे

२. एरी वारीयम – तलाव, कालवे

३. तोत्त वारीयम – बागायती

४. पंच वारीयम – वार्षिक समिती

५. सुवर्ण वारीयम – मंदिरातील सोने-चांदी

६. देवधान वारीयम – मंदिराची दान-देणगी

**कुडवोलै निवडणूक पद्धत:**

'कुडवोलै' ही चिठ्ठी पद्धत वापरून पारदर्शक निवडणुका घेतल्या जात. 'कुडवोलै' या शब्दाचा अर्थ 'कुड' (भांडे) आणि 'ओलै' (ताडपत्र) असा आहे. यात उमेदवारांची नावे ताडपत्रांवर (पामपत्रांवर) लिहून एका मातीच्या भांड्यात (कुडम) टाकली जात. एक तटस्थ व्यक्ती, सहसा लहान मुलगा, भांड्यातून चिठ्ठी काढत असे. ही पद्धत यादृच्छिक निवडीवर आधारित होती, ज्यामुळे पक्षपात टाळला जात असे.[३]

**निवडणूकसाठी खालीलप्रमाणे त्यांनी पात्रता निकष ठरविले होते.**

शिलालेखातील शब्दशः नियम **"स्वस्ति श्री । तिरुमुक्कुडल् पेरुमक्कळ् उक्कुं । इव्वूर्प् पेरुमक्कळ् उक्कुं । इव्वूर् चतुर्वेदिमंगलत्तुक्कु । पळैय पेर् उत्तिरमेरूर् चतुर्वेदिमंगलम्..."**

१. उमेदवार याचे स्वत: चे जमीन मालकी असावी.

२. उमेदवार यास किमान वेद, उपनिषद, ब्राह्मण्यके, आरण्यके यापैकी एका शास्त्रांचे ज्ञान असावे.

३. उमेदवार याचे वय 35-70 वयोगट दरम्यान असावे.

४. उमेदवारावर कोणत्याही प्रकारचे गुन्हेगारी स्वरूपाचे किंवा भ्रष्टाचाराच्या तक्रारीचा कुठेही नोंद नसावा.

५. उमेदवार स्थानिक प्रशासनाला नियमितपणे कर भरलेला असावा.

ज्या प्रमाणे निवडणूकसाठी पात्रता निकष ठरविले आहेत त्याप्रमाणे अपात्रता निकष सुद्धा तत्कालीन उत्तरमेरूर येथील स्थानिक प्रशासकांनी निकष ठरविले होते.[४]

**निवडणूकसाठी अपात्रता निकष पुढील प्रमाणे:**

१. जर कोणी पूर्वी सदस्य असून चुकीचे काम केले असल्यास तो अपात्र ठरत असे.

२. जर कोणी सदस्य खोटे साक्ष दिल्यास, चोरी केल्यास किंवा व्यभिचार केल्यास तो अपात्र ठरत असे.

३. अपराध करणाऱ्याच्या कुटुंबातील पुढील सात पिढ्या अपात्र म्हणून गणले जात असे.

४. उमेदवाराचे जर कोणी नातेवाईक सदस्य वरील अपात्र मधील सदस्य असतील तर अपात्र म्हणून गणले जात.

**निवडणूकसाठी वार्ड पद्धत:**

ब्रह्मदेय ही ब्राह्मण नागरिकांचे स्वतंत्र गाव होते. या गावांमधील जमीन मालक आणि विद्वानांनी बनलेली होती. म्हणजेच येथील सर्व नागरिक सुशिक्षित व उच्च विद्याविभूषित होते. उत्तरमेरूर येथील प्रशासकांनी तेथील लोकसंख्यानुसार वार्डांची रचना केलेली दिसते. ब्रह्मदेय गावांमध्ये एकूण ३० वार्ड होते. प्रत्येक वार्डातून एक प्रतिनिधी निवडून देणे बंधनकारक होते.

**निवडणूक पद्धत:**

ज्या दिवशी निवडणूक होणार होत असे, त्याआधी प्रत्येक वार्डात 'दवंडी पिटवणे' सारखे प्रचलित संदेशवहन प्रकारानुसार दवंडी द्वारे निवडणूकचे माहिती देत असत. इच्छुक उमेदवार हा उपरोक्त सर्व पात्र निकष पडताळणी करूनच निवडणूक घेणारे जे समिती असत त्या समितीच्या सदस्यांना आपल्या उमेदवारीबाबत कळवीत असे.

निवडणूक ही उत्तरमेरूर येथील सभागृहात घेतली जात असे. या सभागृहात तीस वार्डातील सर्व नागरिक उपस्थित असत.[५]

**कुडवोलै पद्धत प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया**:

१. सर्वप्रथम एक चिठ्ठी तयार करायचे असते त्या चिठ्ठीवर प्रत्येक पात्र उमेदवाराचे नाव पाम पानावर म्हणजेच चिठ्ठीवर लिहिले जाई. नाव लिहिताना दोन्ही बाजूंनी नाव लिहिले जात असे कारण यात जर काही फेरफार होत असेल तर सदर फेरफार टाळण्यासाठी हा उपाययोजना केला होता.

२. प्रत्येक वॉर्डसाठी स्वतंत्रपणे दोन मातीची भांडी ठेवली जायची. एक भांडे चिठ्ठ्यांसाठी आणि दुसरे भांडे निवडलेल्या चिठ्ठ्या ठेवण्यासाठी. यामुळे चिठ्ठीमधील पारदर्शकता निदर्शनास येते.

३. सर्व वार्डातील एक पुरुष प्रतिनिधी येऊन आपल्या वॉर्डच्या भांड्यात चिठ्ठी टाकायचा असतो. या ब्रह्मदेय गावात फक्त पुरुषांनाच मतदानाचा प्रतिनिधी म्हणून अधिकार दिले होते. स्त्रियांना असा अधिकार दिला नव्हता.

४. यानंतर ज्या प्रत्येक स्वतंत्र वार्डाकरिता ज्या भांड्यात चिठ्ठी ठेवले होते त्या भांड्यातून एक चिठ्ठी एक लहान १० – १२ वर्ष वयाच्या मुलाकडून किंवा मंदिराचा पुरोहित डोळे झाकून चिठ्ठ्या काढत असे. प्रत्येक वॉर्डमधून फक्त एकच नाव काढले जाई. ज्या उमेदवाराला जास्त चिठ्ठ्या मिळालेल्या असतात असा उमेदवार निवडून येई. जर दोन्ही उमेदवारांमध्ये बरोबरी झाली तर पुन्हा चिठ्ठी काढात असे. थोडक्यात अंतिम उमेदवार निवड होईपर्यंत प्रक्रिया सुरु राहते.

५. जो उमेदवार निवडून येईल त्या निवडलेल्या व्यक्तीचे नाव मंदिराच्या भिंतीवर कोरले जाई किंवा दवंडी पिटवून गावभर घोषणा केली जाई.[६]

**कार्यकाळ व समित्या:**

निवडून आलेल्या उमेदवाराचे कार्यकाल एकूण ३६० दिवसांचे म्हणजेच तत्कालीन दिनमान गणनेनुसार एक वर्ष असे.

निवडून आलेल्या सदस्यांचे एकूण सहा समित्या असत. त्यांचे ३० सदस्यांचे महासभा असे. समित्यांना वारीयम म्हणत असे. वारीयम म्हणजे समित्या पुढीलप्रमाणे

१. उद्यान समिती – यात गावातील बागा, झाडे यांची निगा व संवर्धन कामकाज असे.
२. एरी समिती – यात गावातील तलाव, कालवे यांची निगा व संवर्धन कामकाज असे.
३. तोत्त समिती – यात गावातील बागायती यांची निगा व संवर्धन कामकाज असे.
४. पंच समिती – ही वार्षिक समिती होती. यात लेखाजोखा संदर्भात कामकाज असे.
५. सुवर्ण समिती – यात ब्रह्मदेय गावातील मंदिरातील सोने-चांदी संदर्भात कामकाज असे.
६. देवधान समिती – यात ब्रह्मदेय गावातील मंदिराची दान-देणगी संदर्भात कामकाज असे.[७]

दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात निवडणुका घेतल्या जात असत. दर महिन्याला खाते तपासणी बंधनकारक होते. ही सर्व प्रक्रिया मंदिरात सर्वांसमोर होत असे. त्यामुळे साहजिकच पारदर्शकता टिकवून राही आणि ब्रह्मदेय गावातील प्रत्येक लहान मोठ्या नागरिकांना उपरोक्त सहा समितीचे कामकाजबाबत सर्व कामकाज विना मोबदला व कोणत्याही प्रकारचे कामकाज दडपून ठेवणे असे प्रकार दिसून येत नाही. उपरोक्त समितीमध्ये जर कोणी सदस्य चुकीचे काम केल्यास किंवा समितीच्या कामकाजात हलगर्जीपणा केल्यास किंवा फसवणूक केल्यास त्या सदस्यास त्या समितीमधून योग्य तो चौकशी करून काढून टाकले जाई. त्यास शिक्षा म्हणून संपूर्ण गावात गाढवावर धिंड काढले जाई. जेणेकरून संपूर्ण गावात त्याच्या गुन्ह्याची माहिती कळावी व पुढील निवडणूक मध्ये तो किंवा त्याच्या कुटुंबातील कोणताही सदस्य आणि त्याचे नातेवाईक

उमेदवार व मतदार म्हणून उभे राहणार नाहीत याचे संदेश दिले जाई.[८]

**संशोधनात्मक विश्लेषण ऐतिहासिक महत्त्व:**

चोल साम्राज्याच्या उत्तरमेरूर येथील दोन शिलालेख हे प्राचीन भारतातील स्थानिक स्वशासन म्हणजेच लोकशाही व्यवस्था आणि प्रशासकीय व्यवस्थेचे उत्कृष्ट जिवंत उदाहरण असल्याने येथील शिलालेख हे जगातील सर्वात प्राचीन लिखित निवडणूक नियमावली आहे असे मानले जाते. इंग्लंड च्या मॅग्ना कार्टाचे कायदा इसवी सन १२१५ मध्ये अस्तित्वात आले होते. त्यापेक्षा ३०० वर्षे आधी भारतातील उत्तरमेरूर या गावात लोकशाही नांदत होती. थोडक्यात इंग्लंड च्या मॅग्ना कार्टाचे कायदा पेक्षा विकसित रूपातील लिखित रूपातील कायदा तथा घटना पूर्णपणे अंमलबजावणी स्वरुतात अस्तित्वात होती. भारतात लोकशाही परंपरा हजारो वर्षांची आहे, ही गोष्ट सिद्ध करते.

**उत्तरमेरूर येथील लोकशाहीचे स्वरूप:**

उत्तरमेरूर येथील प्राप्त शिलालेखमधील माहितीनुसार त्याठिकाणी लोकशाही होती, परंतु ती लोकशाही फक्त ब्रह्मदेय गावातील ब्राम्हण जमीनदारांपुरती मर्यादित होती तसेच ती फक्त पुरुषांनाच उमेदवार व मतदानाचा अधिकार देणारी स्वरूप होती. गावातील ग्रामसभेने ठरविल्यानुसार ब्राम्हण स्त्रियांना उमेदवार व मतदान करण्याचा अधिकार नव्हता. एवढी एक उणीव होती. चोल राज्यकर्त्यांनी फक्त सुशिक्षित, उच्च विद्याविभूषित व विद्वान ब्राह्मण यांनाच ब्रह्मदेय गाव दिल्याने इतर सामजिक स्तरावरील नागरिकांना या प्रवेश नव्हता हे निश्चित होते. जसे की, आजच्या काळातील १८६० च्या सोसायटी ॲक्ट नुसार एखाद्या भाषिक व धार्मिक अल्पसंख्याक संस्थानुसार त्याच भाषिक व अल्पसंख्याक लोकांना संस्थेचे सभासदाचे अधिकार असतात तसे उत्तरमेरूर येथील ब्रह्मदेय गावाचे होते. त्यामुळे इथे इतर सामजिक स्तरावरील नागरिक व ब्रह्मदेय गावातील नागरिक यांच्यात दुजाभाव असल्याचे आपण टीका व टिप्पणी करू शकत नाही. उत्तरमेरूर येथील लोकशाही ही फक्त सुशिक्षित, उच्च विद्याविभूषित व विद्वान ब्राह्मणपुरती मर्यादित असले तरी त्यांनी लोकशाही पूर्णपणे पारदर्शकता, जबाबदारी सुशासन पद्धती व नियमांचे तंतोतंत पालन केले असल्याने त्यांच्या लोकशाहीत आधुनिक लोकशाहीचे मूलतत्त्वे समाविष्ट असल्याचे निदर्शनास येते.

**भारतीय राजकीय नेत्यांवर प्रभाव:**

भारतातील तत्कालीन पंतप्रधान मा. राजीव गांधी यांनी उत्तरमेरूर येथील पूर्णपणे पारदर्शकता, जबाबदारी सुशासन पद्धती व नियमांचे तंतोतंत पालन करणारी लोकशाही याला प्रेरणा मानून संपूर्ण भारतात घटनात्मक दुरुस्तीद्वारे कायदेशीररित्या पंचायतराज मजबूत केले आहे. विद्यमान पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी चोल राज्यकर्त्यांच्या चोल साम्राज्यविस्तार बाबत व उत्तरमेरूर येथील लोकशाही बाबत २०२३ मध्ये उल्लेख केला आहे. त्यांनी "उत्तरमेरूर शिलालेख हा भारताच्या लोकशाही परंपरेचा जगातील सर्वात जुना पुरावा आहे." असे गौरवोद्गार काढले आहे.[९]

**निष्कर्ष:**

चोल साम्राज्यातील कांचीपुरम येथील उत्तरमेरूर ब्रह्मदेय गावातील वैकुंठ पेरूमल मंदिराच्या भिंतीवरील दोन शिलालेख हे तत्कालीन एक आदर्शवादी, पारदर्शक, जबाबदारी शासन पद्धतीचे एक उत्कृष्ट लोकशाही पद्धतीचे लोकशाही नांदत असल्याचे पुरावा आहे. ब्रह्मदेय गावातील विद्वान, सुशिक्षित व उच्च विद्याविभूषित नागरिकांनी

लोकशाही परंपरा जपली होती अतिशय महत्त्वाचे होते. त्या गावातील लोकशाही ही तत्कालीन शांतता व सुव्यवस्था नुसार सामाजिकदृष्ट्या विभागणी केलेली केवळ ब्राह्मणांची असली तरी इतर सामाजिक स्तरावरील जसे जैन व बौद्ध धर्मीय नागरिकांना सुद्धा स्वतंत्र जमीन ब्रह्मदेय सारखे दान दिले होते. त्यामुळे असे म्हणता येईल की, उत्तरमेरूर सारखे लोकशाही चोल साम्राज्यात इतरही ठिकाणी कार्यरत होती. एकंदरीत उपरोक्त संशोधकाच्या विवेचनावरून असे म्हणता येईल की, सदर गावातील वैकुंठ पेरूमल मंदिराच्या भिंतीवरील दोन शिलालेखनुसार तत्कालीन भारतीय नागरिक उच्चविद्या विभूषित सुशिक्षित होते आणि तसे ते राहत होते.

**संदर्भ :**


1. https://www.tnrd.tn.gov.in/reports/Jain_Report/english/annex3.pdf
2. K.A.N. Sastri: Studies in Chola History and Administration, Madras, 1932, p.45
3. R. Marumuth., "The Panchayat System under the Cholas Studies from Inscriptions" in Historical Research Letter., 2015
4. "The Evolution of Local Self-government in India – Historical Perspectives" in http://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/84422/7/07_chapter%202.pdf, 2013
5. https://www.ijcrt.org/papers/IJCRT2402560.pdf
6. https://www.jetir.org/view?paper=JETIR2408558
7. http://bharatkalyan97.blogspot.com/2021/06/itihasa-uttaramerur-inscription-full.html
8. https://www.thehindu.com/news/cities/chennai/millennium-inscriptions-shed-light-on-polling-system-of-tamils/article68062030.ece
9. https://indianexpress.com/article/explained/explained-history/uttaramerur-inscription-pm-modi-8556704/